डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५ ७१२ जिल्हा-रत्नागिरी

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे–७/474/२०२३ दिनांक : 24 FEB 2023

**निविदा सूचना क्र. ५९ (२०२२-२३)**

विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत **स्थापत्य** ठेकेदाराकडून बी–१ नमुन्यामध्ये (व्दि–लखोटा पध्दत) खालील कामांसाठी कार्यालयीन वेळेमध्ये (सुट्टीचे दिवस धरून)मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सर्व कोऱ्या निविदा पत्रिका दापोली येथील विद्यापीठ अभियंता यांचे कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध होतील व सिलबंद निविदा विद्यापीठ अभियंता, ता.दापोली, जि.रत्नागिरी यांचे कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदा खाली निर्देशित केलेल्या दिवशी (शक्य झाल्यास) उपस्थित ठेकेदार किंवा ठेकेदारांचे प्रतिनिधी यांचे समक्ष अथवा अनुपस्थितीत दापोली येथील मुख्यालयातील विद्यापीठ अभियंता यांचे दालनामध्ये उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रूपये | इसाऱ्याची रक्कम रूपये | निविदा पत्रिकेची किंमत रूपये (ना परतावा) | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृषी संशोधन केंद्र पालघर येथील एन.ए.आर.पी.प्रक्षेत्रासाठी स्वच्छतागृह बांधणे.जि.पालघर | २,५२,४७०/– | २,६००/– | २००/– | ६० दिवस | नोंदणीकृत कंत्राटदार |
| २ | कृषी संशोधन केंद्र पालघर येथील एन.ए.आर.पी.प्रक्षेत्रावर बकरी शेडचे बीज साठवण केंद्रात रूपांतर करणे.जि.पालघर | २,५२,७२९/– | २,६००/– | २००/– | ६० दिवस | नोंदणीकृत कंत्राटदार |
| ३ | कृषी संशोधन केंद्र पालघर येथील बीज साठवण केंद्रालगत कार्यालयीन खोली बांधणे. जि.पालघर | २,५१,४०१/– | २,६००/– | २००/– | ६० दिवस | नोंदणीकृत कंत्राटदार |

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | कोरी निविदा विक्रीचा कालावधी दिनांक व वेळ | दिनांक २४/०२/२०२३ ते दिनांक ०३/०३/२०२३ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा सादर करावयाची अंतिम तारिख व वेळ | दिनांक ०८/०३/२०२३ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याची अंतिम तारिख व वेळ (तांत्रिक व आर्थिक लखोटा) | दिनांक ०९/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० पासून (शक्य झाल्यास) |

टिप: १. **इसारा रक्कमेचा धनाकर्ष हा डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे असणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे ज्या ठेकेदाराने/कंत्राटदाराने या कार्यालयामार्फत प्रसिध्द केलेल्या निविदेमधील कामांकरिता निविदा सादर केली असेल त्याच ठेकेदाराचे/कंत्राटदाराचे नाव इसारा रक्कमेच्या धनाकर्षावर असणे अनिवार्य आहे. सादर केलेल्या निविदेसोबत एकाच ठेकेदाराच्या नावे असलेले धनाकर्ष जोडले असल्याचे निदर्शनास आल्यास अशा निविदा एकाच ठेकेदाराने सादर केल्याचे गृहीत धरण्यात येवून अशा सर्व निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

२. तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृपया विद्यापीठ अभियंता, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी (फोन नं. ०२३५८–२८२४११, १२, १३) कार्यालयाकडे करण्यात यावी.

३. कोऱ्या निविदा पत्रिकेची मागणी लेखी स्वरूपात करणे आवश्यक असून कोऱ्या निविदा पत्रिकेचे मागणीचे वेळी फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी आणि सिलबंद निविदा बंद पेटीमध्ये सादर करतेवेळी खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्य प्रती अथवा स्वसांक्षाकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे. स्वसाक्षांकनाकरिता शासन निर्णय क्र.प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र. ७१/१८–अ, दिनांक ०९ मार्च २०१५ अन्वये कागदपत्रे सिलबंद पेटीमध्ये सादर करतेवेळी त्यासोबत स्वयं–साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
२. ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेकडे काळ्या यादीत नसल्याबाबतचे नोटरी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष रु. १००/– मात्रचे कोर्ट फी स्टॅम्प वरील स्वतंत्र शपथपत्र. (निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंतच्या एक वर्ष आतील कालावधीचे).
३. महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा–२ दि. २८/११/२०१८ व शासन निर्णय क्र.सीएटी–२०२२/प्र.क्र.५०/इमा–२, दिनांक ११/०५/२०२२ मधील मुद्दा क्र.०५ मध्ये नमूद केलेनुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट अ) नोटरी समक्ष अथवा तहसलिदार यांचे समक्ष रक्कम रू. १००/– रूपयाच्या स्टॅम्प पेपर वर कामाच्या नावाच्या उल्लेखासह लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.
४. जी.एस.टी. प्रमाणपत्राची प्रत बंधनकारक
५. भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करार व मुखत्यारपत्र यांच्या प्रती
६. मागील पाच वर्षात पूर्ण केलेल्या व सध्याहाती असलेल्या शासकीय व निमशासकीय कामांची संबंधीत विभागाने दिलेली यादी. (सन २०१७–१८, सन २०१८–१९, सन २०१९–२०, सन २०२०–२१ व सन २०२१–२२)

कंत्राटदार/कंपनीने प्राधीकृत केलेल्या व्यक्तीकडेच निविदा फॉर्म देण्यात येतील.

४. तसेच सोबत जोडणेत आलेल्या सर्वसाधारण अटी व शर्तीनुसार ठेकेदाराने पालन करणे बंधनकारक राहिल.

24/2/2023
(एन.एम.कुळकर्णी)
विद्यापीठ अभियंता

१. [illegible]
बँक ऑफ इंडीया, सेन्ट्रल बँक ऑफ इंडीया, बँक ऑफ इंडीया इ. राष्ट्रीयकृत बँकेकडील किंवा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेकडील असावा. धनाकर्ष हा Payble at Dapoli असणे अनिवार्य आहे. निविदेसोबत जोडण्यात येणारा इसाऱ्याच्या रकमेचा धनाकर्ष हा निविदा प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून पुढील किमान तीन महिन्याकरीता वैध राहील असा असावा.

२. निविदा फॉर्म फी/इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेमधुन कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत मिळणार नाही.

३. भागीदारी कपंनीच्याबाबतीत निविदा सादर करतेवेळी त्यांना भागीदारीचे करारपत्रासोबत भागीदारांचे फोटो व नोंदणी केलेले भागिदारी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. फक्त विषयांकीत कामाकरीता जर भागीदारी संस्था(जॉइन्ट व्हेन्चर)स्थापन करणेत आली असेल व अशी भागीदारी करून आवश्यक त्या नोंदणीची अर्हता धारण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे या कार्यालयाचे तांत्रिक देकार उघडण्यात आल्यावर निदर्शनास आल्यास त्यांचेबाबतीत आर्थिक देकार(लखोटा क्र.२)उघण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

४. शासन निर्णय क्र. बीसीए.२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७–अ, दिनांक १७/६/२०१० अन्वये ईमारत व ईतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अनुषंगाने ठेकेदाराचे देयकामधून देयकाच्या रक्कमेच्या १ टक्के लेबर सेस वसूल करण्यात येईल.

५. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण–२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन, दिनांक १३/०७/२०२२ अन्वये ठेकेदाराने त्यांचे कामावर नेमणेत येणाऱ्या मजूरांचा विमा कंत्राटी कामाच्या संपूर्ण रक्कमेसह व कामाच्या पूर्ण कालावधीसाठी विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा मुंबई यांचेकडे उतरविणे बंधनकारक आहे. त्यापोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार संबंधित कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून एकूण कंत्राटी मुल्याच्या ०.५ टक्के या दराने विम्यापोटी होणाऱ्या रकमेची वजावट करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

६. खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| a) G.S.T. | - | शासनाचे निर्देशानुसार जी.एस.टी. कराची टक्केवारी ठेकेदाराचे देयकामधून वजावट करणेत येईल हे ठेकेदारावर बंधनकारक राहील. |
| b) Income tax | - | As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India |
| c) Insurance | - | 0.5 % will be deducted from first RA bill |
| d) Labour cess | - | 1.0 % will be deducted from the bills. |

७. जी.एस.टी. कराची वजावट करताना महाराष्ट्रातील निविदाधारकांनी निविदा सादर केल्यास १ टक्के एस.जी.एस.टी. टी.डी.एस. व १ टक्के सी.जी.एस.टी. टी.डी.एस. कपात करण्यात येईल व महाराष्ट्र राज्याबाहेरील ठेकेदारांनी निविदा सादर केल्यास त्यांचेकडून अतिरिक्त २ टक्के आय.जी.एस.टी. टी.डी.एस कपात करणेत येईल. सदर करांची अंमलबजावणी शासन निर्देशानुसार करणेत येईल व ती ठेकेदारावर बंधनकारक राहील. निव्वळ देय होणाऱ्या रक्कम रु. २.५० लाखावरील देयकाकरीता एस.जी.एस.टी. व सी.जी.एस.टी. कर लागु राहील. त्याचप्रमाणे याव्यतिरिक्त शासनाकडून वेळोवळी निर्गमित होणारे वस्तू व सेवा कर संदर्भातील नियम ठेकेदारास लागु राहतील.

८. वरील कामांची सविस्तर निविदा सुचना विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

१०. अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात अनुसरण्याच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्रक.०८/इमा–२ दिनांक २६/११/२०१८ या शासन निर्णयातील अट क्र. १ व २ चे निविदाकारांनी निविदा सादर करतेवेळी पालन करावे.

११. ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळुन येतील अशा निविदाकाराची इसारा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

१२. ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास महसूल व वन विभाग यांच्या दि.०३ जून २०१६ च्या अधिसूचनेमधील अनुच्छेद क्र.६३ मध्ये नमूद केल्यानुसार रू. ५००/– मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करून द्यावा लागेल.

१३. इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

१४. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेले व भविष्यात होणारे शासन निर्णयातील तरतुदींना अधिन राहून निविदा विषयक अंतिमीकरणाचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे रहातील.

१५. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

(एन.एम.कुळकर्णी)
**विद्यापीठ अभियंता**

**प्रत, विद्यापीठ बांधकाम समितीचे सर्व सन्माननीय सदस्य यांना माहितीसाठी सविनय सादर**

प्रत, माहितीसाठी सविनय सादर :–

१. मा. संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली जि.रत्नागिरी
२. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

प्रत, माहितीकरिता रवाना :–

१. नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. प्रभारी अधिकारी,कृषी संशोधन केंद्र पालघर,ता.जि.पालघर

प्रत, माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :–

१. श्री.एस.एन.चौगुले,सहाय्यक अभियंता,उत्तर बांधकाम उपविभाग,काढणी पश्चात व्यवस्थापन पदवुत्तर संस्था किल्ला रोहा जि.रायगड
२. श्री.जी.आर.मोहिते,शाखा अभियंता, उत्तर बांधकाम उपविभाग,काढणी पश्चात व्यवस्थापन पदवुत्तर संस्था किल्ला रोहा जि.रायगड
३ आरेखक,मध्य बांधकाम उपविभाग,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली,जि.रत्नागिरी
४ प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
  २/– यांना कळविण्यात येते की, सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.
५ विद्यापीठ अभियंता,कार्यालय नोटीस बोर्ड, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.